लोकशाही वार्ता
प्रतिबिंब
रविवार, दि. १९ जानेवारी २०२५



# चाहूल अर्थसंकल्पाची!

**हेमंत देसाई**

नवीन अर्थव्यवस्थेचा चांगला विकास होत आहे. उदाहरणार्थ, भारत आता ग्लोबल कॅपॅसिटी सेंटरसाठी जगातील सगळ्यात मोठे केंद्र म्हणून उदयास येत आहे. जगातील पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त ग्लोबल कपॅसिटी सेंटर्स आता भारतात आहेत. त्याचप्रमाणे भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आयटी उद्योग वेगाने वाढत आहे. म्हणजेच नवीन अर्थव्यवस्थेचा किंवा न्यू इकॉनॉमीचा चांगला विस्तार होत आहे.

सध्या जुनी आणि नवीन, अशा दोन करपद्धतींनुसार आयकर आकारणी केली जाते. दोहोंपैकी एका पद्धतीची निवड करावी लागते. जुन्या पद्धतीत विमा, प्रॉव्हिडंट फंड आणि गृहकर्जासाठी वजावटीची सवलत मिळते. यात अडीच लाख रुपयांचे उत्पन्न करमुक्त आहे. अडीच ते पाच लाखांपर्यंत पाच टक्के कर भरावा लागतो. तर पाच ते दहा लाख रुपयांवर २० टक्के आणि दहा लाखांच्या वर ३० टक्के कर द्यावा लागतो. नव्या पद्धतीत कोणतीही वजावट अथवा सूट मिळत नाही. यात तीन लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न संपूर्णपणे करमुक्त आहे. देशातील वस्तू विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी २०२५-२६ या अर्थसंकल्पात १५ लाख रुपयांपर्यंतचे वैयक्तिक उत्पन्न करमुक्त करावे, असा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसे घडल्यास भारतातील मध्यमवर्गाला मोठाच दिलासा मिळेल. तसेच उपभोग्य वस्तूंच्या मागणीलाही पाठबळ मिळेल.

> **१ फेब्रुवारीला सादर होणाऱ्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात सरकार दिलासादायक घोषणा करू शकते, असे मानले जात आहे. वार्षिक १५ लाख रुपये कमावणाऱ्यांनाही सरकार आयकरात सूट देऊ शकते, असे सांगण्यात आले आहे. सध्या नवीन अर्थव्यवस्थेचा चांगला विकास होत आहे. उदाहरणार्थ, भारत आता ग्लोबल कॅपॅसिटी सेंटरसाठी जगातील सगळ्यात मोठे केंद्र म्हणून उदयास येत आहे. जगातील पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त ग्लोबल कपॅसिटी सेंटर्स आता भारतात आहेत. त्याचप्रमाणे भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आयटी उद्योग वेगाने वाढत आहे. म्हणजेच नवीन अर्थव्यवस्थेचा किंवा न्यू इकॉनॉमीचा चांगला विस्तार होत आहे. देशातील वस्तू विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी २०२५-२६ या अर्थसंकल्पात १५ लाख रुपयांपर्यंतचे वैयक्तिक उत्पन्न करमुक्त करावे, असा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसे घडल्यास भारतातील मध्यमवर्गाला मोठाच दिलासा मिळेल. तसेच उपभोग्य वस्तूंच्या मागणीलाही पाठबळ मिळेल.**

सध्या आर्थिक मंदी आणि राहणीमानाचा वाढता खर्च यामुळे देशातील मध्यमवर्गीयांना विविध आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे. करकपातीचा सर्वाधिक लाभ नोकरदार वर्गाला होईल आणि त्यांच्या हातात अधिक पैसा खेळू लागेल. त्यामुळे ग्राहकखर्चात वाढ होऊन अर्थव्यवस्था नरमाईतून बाहेर पडेल, असा मतप्रवाह आहे. मध्यमवर्ग ही देशाची ताकद आहे, अशा आशयाचे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. त्यामुळे या अर्थसंकल्पात मध्यमवर्गास अधिक सवलती मिळतील, अशी शक्यता नक्कीच दिसते.

गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प हा तात्पुरत्या स्वरूपाचा होता. कारण त्यानंतर तीन महिन्यांनी लोकसभा निवडणुका होणार होत्या. परंतु आता निवडणुकांचा हंगाम संपला आहे. काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकाही पार पडल्या आहेत. नवी दिल्लीची निवडणूक वगळता तूर्तास तरी कोणत्याही राज्यात निवडणुका नाहीत. त्यामुळे सवंग लोकप्रियता मिळवून देणारे निर्णय न घेता, धाडसी अर्थसंकल्प सादर करण्याची संधी अर्थमंत्र्यांना मिळाली आहे. एकीकडे अर्थव्यवस्थेचा वेग कमी होत चालला आहे, तर दुसरीकडे देशातील सामान्य लोकांच्या डोक्यावरचे कर्ज वाढत चालले आहे. त्याचबरोबर बचतीचे प्रमाणही चिंताजनकरीत्या कमी झाले आहे. मागणी कमी झाली आहे. त्यामुळे सरकारला करापासून उत्पन्न कमी झाले आहे. त्यातच मध्यमवर्गावरील शाश्वत करापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर सरकार पाणी सोडेल की नाही, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. मागणी वाढावी, म्हणून बाजारात चलन फिरले पाहिजे, त्याचबरोबर नागरिकांची बचतही वाढली पाहिजे आणि मध्यमवर्गाला सवलतही दिली पाहिजे, अशा परस्परविरोधी बाबींतून सरकारपुढे काय निर्णय घ्यावा, याचा पेच आहे. नियोजित अर्थसंकल्पातून सरकार मध्यमवर्गीयांना आयकरात सूट देऊ शकतो, असा अंदाज अर्थसंकल्पाआधी व्यक्त होत आहे.

(पान २वर)

## दिनविशेष




# नेताजी सुभाषचंद्र बोस




नेताजी सुभाषचंद्र बोस (२३ जानेवारी १८९७ - १८ ऑगस्ट १९४५) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते आणि आझाद हिंद सेनेचे सरसेनापती. 'नेताजी' ही त्यांना लोकांनी दिलेली उपाधी. सुभाषबाबूंचे घराणे मूळचे माहिनगरचे (बंगाल). त्यांचे वडील जानकीनाथ वकिलीच्या व्यवसायानिमित्त कटकला (ओडिशा) आले. तेथेच सुभाषचंद्र यांचा जन्म झाला. आई प्रभावतीदेवींनी बालवयात त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाचे आहेत. सुभाषबाबूंवर स्वामी रामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद यांचा फार मोठा प्रभाव शाळेत असतानाच पडला होता. कॉलेजमधील पहिले वर्ष संपल्यानंतरच्या उन्हाळ्याच्या सुटीत सतराव्या वर्षी ते आणि त्यांच्यासारखे त्यांचे चार-पाच मित्र गुरुच्या शोधार्थ निघाले. गुरू तर मिळाला नाहीच उलट तीर्थक्षेत्री जातिपातीचे प्रस्थ पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. आशुतोष मुखर्जींच्या मदतीने त्यांना स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला (१९१७). ते तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिल्या वर्गात बी. ए. झाले (१९१९). त्याच वर्षी वडिलांच्या इच्छेनुसार ते 'आयसीएस'साठी इंग्लंडला गेले. त्यावेळी असहकार आंदोलन सुरू झाले नव्हते. जालियनवाला बाग येथे काय घडले, त्याची पूर्ण कल्पना पंजाब बाहेरच्या लोकांना आली नव्हती. परीक्षेत यश मिळाल्यानंतर हळूहळू सर्व गोष्टी उजेडात आल्या. आंदोलन सुरू झाले, तेव्हा त्यांनी पहिली सक्तीची एक वर्षाची उमेदवारी न करता सरळ नोकरीचा राजीनामा देऊन स्वदेशाची वाट धरली (१९२१). यावेळी महात्मा गांधींची असहकार चळवळ जोरात होती. त्यांची भेट घेऊन पुढील दिशा समजावून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महात्मा गांधीनीच त्यांना कोलकात्याला चित्तरंजन दासांकडे (१९२१) पाठविले. मृत्यूपर्यंत चार वर्षे सुभाषबाबूंचे राजकीय गुरू चित्तरंजनच होते. या सुमारास इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्सच्या कोलकात्यामधील आगमनावर बहिष्कार टाकण्याची मोहीम आखण्यात आली. त्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला (१९२१). त्यात त्यांना चित्तरंजन दासांबरोबर सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. तुरुंगात दासांच्या पुरोगामी विचारांचा सुभाषबाबूंवर फार मोठा परिणाम झाला. कारावासानंतर ते काही दिवस बेंगॉल नॅशनल महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्वराज्य या वृत्तपत्राचे संपादक होते. पुढे चित्तरंजन दास कोलकाताचे महापौर झाल्यावर सुभाषबाबूंकडे मुख्य अधिकाऱ्याची जबाबदारी आली. ब्रिटिश सरकारने सूडबुद्धीने खोटा आरोप लादून ऑक्टोबर १९२४ मध्ये त्यांना स्थानबद्ध केले. पुढे ते बंगाल प्रांतिक काँग्रेस परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी यूथ लीग स्थापन करून तरुणांना संघटित केले. काँग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही नेहरूंबरोबर त्यांची नियुक्ती झाली (१९२८). दोघांनी मिळून इंडिया इंडिपेंडन्स यूथ लीगची स्थापना केली. १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात गूढ रीत्या सुभाषबाबू यांचे निधन झाले.

## सरहद्द गांधी



सरहद्द गांधी या नावाने प्रसिद्ध असलेले खान अब्दुल गफारखान ज्यांना बादशाह खान म्हणूनही ओळखले जाते, हे वायव्य सरहद्द प्रांतातील सर्वात प्रभावशाली स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचा जन्म ३ जून १८९० रोजी झाला. भारतरत्न पुरस्कार मिळालेले हे पहिले अभारतीय होते. गफारखानांनी १९२९ मध्ये 'खुदा ई खिदमतगार' नावाची संघटना उभारली होती. भारत सरकारने १९८७ मध्ये त्यांना 'भारतरत्न' पुरस्काराने गौरवले होते. बादशाह खान ऊर्फ खान अब्दुल गफार खान हे या प्रदेशातील एका उमराव कुटुंबात जन्माला आलेले. जवळजवळ सव्वासहा फूट उंची, पिळदार शरीर, तडफदार चेहरा, तेजस्वी डोळे. तशीच लढाऊ वृत्ती आणि धडाडी. केव्हाही मरायला वा मारायला सज्ज. अशा व्यक्तीला आणि त्या उग्र, धगधगत्या वातावरणात अहिंसेचा विचार सुचावा, हेच आश्चर्य. त्याहून महद् आश्चर्य म्हणजे, तो विचार एक लाखाहून अधिक पठाणांना पटवून देण्यात त्यांना आलेले यश. इंग्रजांचे साम्राज्य बंदूक आणि डावपेच, दहशत आणि कारस्थान यावर उभे राहिलेले. पठाण टोळ्यांना अर्थातच, अशी परकीय राजवट चालणे शक्य नव्हते. बादशाह खान 'फ्रंटियर'वर म्हणजे, तत्कालीन ब्रिटीश इंडियाच्या सीमेवर राहून पख्तुनिस्तानात अहिंसेचे काम करत होते. म्हणून ते पुढे 'फ्रंटियर गांधी' किंवा 'सरहद गांधी' म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांचे निधन २० जानेवारी १९८८ रोजी झाले.

## बाळासाहेब ठाकरे



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म २३ जानेवारी १९२७ रोजी प्रबोधनाची परंपरा असणाऱ्या घरात पुणे येथे झाला. त्यांचे वडील केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे त्या काळात आपल्या लेखनातून, वक्तृत्वातून तसेच कार्याच्या माध्यमातून लोकजागरणाची धुरा सांभाळत होते. प्रबोधनकार अन्यायकारक रूढी-परंपरांवर व जातिभेदात्मक वर्णव्यवस्थेवर कडाडून हल्ला चढवत होते. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण होते. प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा प्रबोधनकारांचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत-नकळतपणे उतरला. १९५० मध्ये ते 'फ्री प्रेस जर्नल'मध्ये व्यंगचित्रकार म्हणून रूजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. 'फ्री प्रेस जर्नल'मध्ये काम करीत असतानाच ते विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी चित्रे-व्यंगचित्रे-जाहिरातीचे डिझाईन या क्षेत्रातही काम करीत असत. त्यांच्या व्यंगचित्रात इंदिरा गांधींची व्यक्तिरेखा आवडती होती. पुढे नोकरी सोडून व्यंगचित्रात्मक साप्ताहिक काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट, १९६० मध्ये 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकासाठीचे हे नाव प्रबोधनकारांनीच सुचविले. मराठीतील हे पहिले व्यंगचित्र साप्ताहिक ठरले. 'मार्मिक'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन यशवंतराव चव्हाण यांच्याहस्ते झाले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झालेला होता, पण मुंबईत मराठी माणसावर अन्याय होतच होता. या प्रश्नाला मार्मिकने वाचा फोडली. प्रबोधनकार ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक - वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती. बाळासाहेब ठाकरे यांचे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईत निधन झाले.

## चिं. वि. जोशी



चिं. वि. तथा चिंतामण विनायक जोशी (१९ जानेवारी १८९२ -२१ नोव्हेंबर १९६३ ) हे सुप्रसिध्द मराठी विनोदी लेखक होते. त्यांचा जन्म पुणे येथे झाला. सुधारक या पत्राचे संपादक वि. रा. जोशी हे त्यांचे वडील. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण. फर्ग्युसन कॉलेजातून बी.ए. (१९१३), एम.ए. (१९१६) झाले. पाली भाषेचा विशेष व्यासंग होता. आरंभी चार वर्षे सरकारी शिक्षणखात्यात माध्यमिक शिक्षक. पुढे १९२० पासून बदोद्यात नोकरीच्या निमित्ताने वास्तव्य. प्रथम आठ वर्षे बडोदा कॉलेजात पाली, इंग्रजी आणि मराठी या भाषांचे प्राध्यापक. १९२८ पासून बडोदा सरकारचे दप्तरदार. १९४९ मध्ये निवृत्त. बडोद्याच्या वास्तव्यात गुजराती भाषेशी त्यांचा उत्तम परिचय झाला. तेथील सहविचारिणी सभेच्या व निवृत्तीनंतर पुण्यास आल्यावर मराठी साहित्य परिषदेच्या कार्यात सहभाग. सहविचारिणी सभेच्या विद्यमाने निघणाऱ्या सहविचार ह्या नियतकालिकाचे एक संपादक. अ मॅन्युअल ऑफ पाली सध्दम्मप्पकासिनि (संपादन), पाली कंकॉर्डन्स (कोश), जातकांतील निवडक गोष्टी (१९३०), शाक्यमुनी गौतम ही त्यांची ग्रंथनिर्मिती त्यांच्या पालीच्या व्यासंगाची द्योतक आहे; पण याहीपेक्षा विविध पुस्तके लिहून त्यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली ती विशेष महत्त्वाची होय. विनोदी लेखनाची प्रेरणा त्यांना कोल्हटकर-गडकरी यांच्या कोटित्वयुक्त लेखनातून मिळाली व त्याचा ठसा आपणास त्यांच्या प्रारंभीच्या एरंडाचे गुऱ्हाळ (१९३२)मधील लेखन व चिमणरावांचे चऱ्हाटमधील विवाहविषयक लेख यांवर स्पष्ट दिसतो. या मराठी लेखकांबरोबरच विदेशी लेखकांचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्यांनी चिमणराव व गुंडयाभाऊ अशी मानसपुत्रांची जोडगोळी जन्मास घातली.

## चाहूल अर्थसंकल्पाची!

(पान १ वरून)

सरकारला मध्यमवर्गीयांना करात सवलत द्यायची आहे. मंदीमुळे खप वाढवण्याची सरकारची योजना आहे. या कारणांमुळे सरकार १५ लाखांपर्यंत कमावणाऱ्या मध्यमवर्गीयांना आयकरात सूट देण्याचा विचार करत आहे. असे झाल्यास लाखो करदात्यांना त्याचा फायदा होईल. दुसरीकडे, अवघ्या तीन टक्के करदात्यांकडून शाश्वत उत्पन्न मिळते. आता कोणतीही निवडणूक नसताना अशा करदात्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाला मुकायचे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मध्यमवर्ग हा भाजपचा हक्काचा पाठिराखा आहे. तो कुठेही जात नाही, अशी भाजपची पक्की धारणा आहे. दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुकांचा विचार करून आयकरात सूट देण्याचा अंदाज असला, तरी सरकार खरेच हा निर्णय घेईल का, याबाबत साशंकता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याबाबत जो काही निर्णय घेतला जाईल, त्याची घोषणा १ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात केली जाईल. सरकारने मध्यमवर्गीयांसाठी आयकर कमी केल्यास अशा लोकांच्या हातात अधिक पैसा येईल. या पैशातून देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. आज महागाईचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीयांना बसत आहे. महागाईच्या तुलनेत पगारवाढ मंदावली आहे. साबण, शाम्पूपासून कार- दुचाकीपर्यंत सर्वच वस्तूंची मागणी कमी झाली आहे. या परिस्थितीत सरकारला आयकरात सूट देऊन मध्यमवर्गीयांना खूश करायचे आहे.




अर्थसंकल्पात आयकराच्या कलम ८० सी अंतर्गत कर सूट देण्याबाबत काही घोषणा केली जाईल का, याकडेही लक्ष लागले आहे. आयकराच्या कलम ८० सी अंतर्गत एकूण उत्पन्नातून दीड लाख रुपयांच्या कपातीचा दावा केला जाऊ शकतो. कलम ८० द्वारे एकूण करपात्र उत्पन्न दीड लाख रुपयांपर्यंत कमी करता येते. मुदत विमा, पाच वर्षांची मुदत ठेव आणि ज्येष्ठ नागरिक बचत योजनेसह इतर योजनांमध्ये गुंतवणूक करून याचा लाभ घेता येऊ शकतो. यावरील सूट बऱ्याच काळापासून वाढवण्यात आलेली नाही. आयकराच्या कलम ८० सीव्यतिरिक्त बजेटमध्ये विमा प्रीमियमवरदेखील सूट दिली जाऊ शकते. टर्म इन्शुरन्स आणि हेल्थ इन्शुरन्सला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थ मंत्रालय उद्योगांकडून आलेल्या सूचनांवर विचार करत आहे. महिलांना विशेष सूट देण्याची मागणी करण्यात आली आहे. सरकार ही मर्यादा तीन लाखांपर्यंत वाढवण्याचा विचार करत आहे, जेणेकरून करदात्यांना अधिक कर सवलत मिळू शकेल. तथापि या सर्व शक्यता आणि अनुमान आहेत, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

## वेगळे काही

### बुटके लोक

**चीनमधील शिचू** आन प्रांतामधील यांगसी गावामध्ये बहुतांश लोक बुटके आहेत. साधारणतः २० हजार लोकांमधला एक माणूस बुटका असतो. पण या गावामध्ये प्रत्येकी ८० लोकांमधील ३६ लोक बुटके आढळून येतात. म्हणजे इथली जवळपास निम्मी जनता बुटकी आहे. हे नैसर्गिक नसून, कुठल्यातरी व्याधीचा परिणाम असल्याचं त्यांनी सांगितलं होतं. या गावातील मुलांची उंची पाच ते सात वर्षांपर्यंत सर्वसामान्य मुलांप्रमाणे वाढते. मात्र त्यानंतर उंची वाढणं बंद होतं. हा अनुवांशिक आजार आहे की, भौगोलिक वातावरणाचा परिणाम आहे, हे अद्याप कळायला मार्ग नाही. मात्र आपल्या मुलांना सामान्य आयुष्य जगता यावं, यासाठी येथील काही लोक गाव सोडून जात आहेत.

### नतालियाचा कोल्हा

**इंग्लंडमधल्या** बॅकफोर्ड गावात राहणाऱ्या नतालियाने घरात कोल्हा पाळला आहे. पण कोल्हा पाळण्यासारखं असं झालं तरी काय? तर मंडळी, एका कार्टून व्यक्तिरेखेवरून तिला हे सुचलं. हा कोल्हा तिने वेल वाईल्डलाईफ हॉस्पिटल अँण्ड रिहॅबिलिटेशन सेंटरमधून दत्तक घेतला. कोल्हा तसा धोकादायक प्राणी, पण नतालिया आणि तिच्या घरच्यांसोबत त्याने छान जुळवून घेतलं आहे. जॅस्पर असं या कोल्ह्याचं नाव आहे. तो नतालियाच्या मुलांसोबत खूप मस्ती करतो. पाळीव कुत्र्याप्रमाणे त्याचं वागणं असतं. नतालियाने कुत्रा आणि मांजरही पाळलं आहे. पण जॅस्पर कोणालाही त्रास देत नाही. ते एकमेकांसोबत छान खेळतात.

# कुंभमेळ्याचे आध्यात्मिक महत्त्व!

**कुंभमेळा हे भारतीय तत्त्वज्ञान, धार्मिक परंपरा आणि आध्यात्मिक चिंतनाचे महत्त्वाचे केंद्र आहे. त्याचे आध्यात्मिक महत्त्व केवळ हिंदू धर्माला समृद्ध करत नाही, तर साधना करणाऱ्यांना आनंद प्राप्तीसाठी योग्य दिशा देते. महाकुंभमेळ्यात कोट्यवधी लोक एकत्र येतात. त्यामुळे तो एकता आणि शांततेचा संदेश देतो. हा सोहळा सामाजिक आणि सांस्कृतिक एकतेसाठी बळकटी प्रदान करतो. महाकुंभमेळ्यामुळे सर्वत्र चैतन्याची उधळण होते.**



कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या आणि भव्य धार्मिक सोहळ्यांपैकी एक आहे, जो भारतीय संस्कृती आणि आध्यात्मिकतेच्या समृद्धीचे प्रतीक आहे. या मेळ्याचे आयोजन भारतातील चार पवित्र स्थळांवर - प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथे बारा वर्षांच्या अंतराने केले जाते. याशिवाय, सहा वर्षांनी अर्धकुंभही आयोजित केला जातो. कुंभमेळा भारतीय तत्त्वज्ञान, धार्मिक परंपरा आणि आध्यात्मिक चिंतनाचे महत्त्वाचे केंद्र आहे. त्याचे आध्यात्मिक महत्त्व केवळ हिंदू धर्माला समृद्ध करत नाही, तर साधना करणाऱ्यांना आनंद प्राप्तीसाठी योग्य दिशा देतो.

**पवित्र स्नानाचे महत्त्व**

कुंभमेळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे गंगा, यमुना या पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे होय. अशी मान्यता आहे की या नद्यांमध्ये स्नान केल्याने सर्व पापांपासून मुक्ती मिळते आणि आत्मशुद्धी होते. ही केवळ शरीर शुद्ध करण्याची प्रक्रिया नाही, तर मनः शांतीही मिळते.

**मोक्षप्राप्तीचा मार्ग**

धार्मिक श्रद्धेनुसार, कुंभमेळ्याच्या काळात पवित्र स्थळी स्नान केल्याने मोक्षप्राप्ती होते. हे जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्तीचा मार्ग दाखवते.

**ज्ञानाचे आदानप्रदान**

कुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नाही, तर संत, महात्मे, योगी आणि विद्वान यांच्यासाठी एक व्यासपीठ आहे, जिथे ते आपले ज्ञान आणि अनुभव याची चर्चा करतात. ध्यान, योग, प्रवचन आणि धार्मिक विधींमधून हा मेळा आध्यात्मिक जागरूकतेस चालना देतो. यामुळे आध्यात्मिक सामर्थ्य बळकट होण्यास मदत होते.

हा सोहळा भक्तांना धर्मज्ञान देतो. आणि त्यामुळे त्यांची साधनेवरील श्रद्धा बळकट होते. साधक त्याच्या मूळ स्वरूपाशी म्हणजे ईश्वराशी जोडला जातो. भारतीय संस्कृती आणि परंपरेची उच्च अनुभूती देऊन श्रद्धा बळकट करणारा हा सोहळा आहे.

**सामाजिक एकतेचा मेळा**

कुंभमेळ्यात लाखो लोक एकत्र येतात. त्यामुळे तो एकता, समरसता आणि शांततेचा संदेश देतो. हा सोहळा सामाजिक आणि सांस्कृतिक एकतेसाठी बळकटी प्रदान करतो. कुंभमेळ्यामुळे सर्वत्र चैतन्याची उधळण होते.

कुंभमेळ्याची कथा समुद्रमंथनाशी संबंधित आहे. अमृतप्राप्तीसाठी देव आणि दानवांनी समुद्रमंथन केले होते. त्यावेळी अमृतकुंभातील काही थेंब प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथे पडले. म्हणूनच या स्थळांना पवित्र मानले जाते. याच कारणामुळे या ठिकाणी कुंभमेळा भरतो.

## चौफेर

**आत्मशुद्धीसाठी धर्माचरण**

कुंभमेळ्यात सहभागी होणारे भक्त तप, व्रत, ध्यान आणि साधना यांसारख्या आध्यात्मिक शिस्तीचे पालन करतात. त्यालाच धर्माचरण म्हणतात. आत्मशुद्धी आणि आत्म्याच्या उन्नतीसाठी धर्माचरण करणे गरजेचे आहे.


**गंगा स्नान आणि पापांचा नाश**

गंगा नदीला "पापनाशिनी" म्हटले आहे. हिंदू धर्मानुसार, गंगेतील स्नानामुळे केवळ शरीर शुद्ध होत नाही, तर आत्मशुद्धीसुद्धा होते. पुराणांमध्ये असे म्हटले आहे की, गंगेतील स्नानाने सर्व प्रकारचे पाप नष्ट होतात. हा उल्लेख अनेक धर्मग्रंथात सापडतो.

कुंभक्षेत्रामध्ये देशभरातून आलेले संत, आखाडे, आध्यात्मिक संस्था आदींना हिंदू जनजागृती समितीच्या कार्याची माहिती देऊन हिंदू राष्ट्रासाठी आशीर्वाद घेणे, तसेच भाविकांमध्ये राष्ट्र रक्षण आणि धर्माविषयी जागृती करण्याचे कार्य समिती गेल्या २० वर्षांपासून करीत आहे. यंदाच्या कुंभक्षेत्रीसुद्धा विविध प्रदर्शन, सभा इत्यादींच्या माध्यमातून हिंदू जनजागृती समिती कार्य करणार आहे. जिज्ञासू आणि धर्मप्रेमींनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

■ संकलक : निलेश सिंगबाळ
हिंदू जनजागृती समिती
मो. ९३७३५३६३७०

## मंथन




# शिक्षण आणि बदलता काळ

शिक्षणानं व्यक्ती पुढे जात असते. त्याचा दर्जा वाढतो. समाजात तेवढीच इज्जतही वाढते. शिकविण्यासाठी गरज पडते शिक्षकांची. शिक्षकच हे विद्यार्थ्यांना शिकवीत असतात. त्यांचं जीवन घडवीत असतात. ज्या शिक्षणाच्या भरवशावर व्यक्तीचे विचार प्रगल्भ होत असतात. शिक्षक ज्ञान देत असतात. बदल्यात मोबदला घेत असतात.

शिक्षणातही आज भेदभाव निर्माण होत आहे. काही शिक्षकांना भरपूर वेतन मिळतं. तर काही शिक्षकांना शिकविण्याचं वेतनच मिळत नाही. ज्या शिक्षकांना भरपूर वेतन मिळत असतं. ते शिक्षक ज्या शाळेत शिकवतात, त्या शाळेत विद्यार्थी पटसंख्या कमी असते आणि काही शिक्षक जे कॉन्व्हेंटला शिकवतात, त्या शिक्षकांना पुरेसं वेतनच नसतं. पूर्वी शिक्षणाची व्यवस्था एका आश्रमात असायची. तो आश्रम की ज्या आश्रमात एक कच्चे घर असायचे नव्हे तर कुडानं बनवलेलं झोपडं असायचं. ज्यात चारही बाजूनं हवा यायची. सतत जंगली श्वापदाची भीती असायची. ती श्वापदं जंगलातून यायचे व त्या विद्यार्थ्यांवर हल्लाही करायचे. त्यातच साप, विंचूसारखे प्राणी वेगळेच. अशा भययुक्त वातावरणात विद्यार्थ्यांची शाळा असायची. त्यातच काही विद्यार्थी पहारा देण्याचेही काम करायचे. शिकणे-शिकविणे ही क्रिया एकजुटीनं व मिळून-मिसळून घडायची. भेदभाव नसायचा आपापसात, ना ही कोणत्याच विद्यार्थ्यांची एकमेकांविरुद्ध कुरकूर असायची.

तो काळ व त्यांना शिकविणारा तो गुरू. तो गुरू फक्त विद्यार्थ्यांना आपलं संरक्षण कसं करायचं, तेवढंच शिकवायचा. मात्र तो त्यांचं रक्षण करीत नसे, तर त्या विद्यार्थ्यांसमोर संकट उत्पन्न करायचा! ज्यातून विद्यार्थी घडायचे. शिवाय विद्यार्थीच आपल्या गुरुचं त्या जंगली प्राण्यांपासून रक्षण करायचे. त्यांना अशा प्राण्यांची भीती वाटलीच वा एखादा प्राणी आश्रमाजवळ आढळलाच, तर तेच शिष्य त्या प्राण्यांना हुसकावून लावायचे.

हळूहळू काळ बदलला. त्या बदलत्या काळानुसार अनेक बदलाव शिक्षणात झाले. आश्रमाची जागा जाऊन इमारत आली. विद्यार्थ्यांना पुर्ण शरीर झाकेल असा पोशाख




आला. तसं पाहिल्यास पूर्वीच्या काळात विद्यार्थी हे संन्यासी वृत्तीनं शिक्षण घ्यायचे. ते सर्वप्रथम आपलं शरीर बनवायचे. आज तसं नाही. तशीच आज बैठक व्यवस्थाही बदलली. आज विद्यार्थ्यांना बसायला बाक आला, जो काल नव्हता. आज शिक्षणाची व्यवस्था सध्या एका इमारतीत झाली आहे. ज्या इमारतीला रंग मारावा लागतो. कशासाठी? तर इमारत चांगली असेल तर विद्यार्थी येईल या भावनेनं. शाळा चालावी या भावनेनं. शिक्षणात जणू स्पर्धा निर्माण झाली आहे. कारण आज दिखाव्याचं जग आहे. आज शिक्षणाला पाहिजे त्या प्रमाणात वाव नाही. जेवढा भपकेबाजपणा, तेवढं शिक्षण. असं आजचं शिक्षणाचं गणित आहे. कारण शाळेचा दर्जाच अशा भपकेबाजपणावर अवलंबून आहे. आज काळ बदलला आहे. तसा समाजही बदलला आहे व बदलत्या समाजानुसार शिक्षणाची व्याख्याही बदलली आहे. त्यानुसार असं वाटतं की आज खरं शिक्षण शाळेतून मिळतच नाही.

काल एकलव्यासारख्या एका विद्यार्थ्याच्या मनात शिक्षणाची इच्छा होती. त्याला राजवाड्यातील मुलांना जे शिक्षण मिळतं, ते शिकायचं होतं. परंतु ते शिकायला मिळालं नाही. शिवाय त्याचा अंगठाही घेण्याची कृती घडली. आजही तेच घडत आहे. आजही शिक्षणात भेदभावच केला जात आहेत. आजच्या शिक्षणातील भेदभाव कोणता? असा विचार केल्यास आज शिक्षणात गरीब विद्यार्थ्यांना कॉन्व्हेंटचं शिक्षण मिळत नाही. शिवाय उच्च शिक्षण घेतो म्हटल्यास तेही घेता येत नाही. एखाद्या गरीब विद्यार्थ्यानं काही बनतो म्हटलं तर ते बनता येत नाही. कारण त्याला पैसा लागतो. तो पैसा गरिबांकडे राहत नाही. हा शिक्षणातील भेदभावच नाही का? हा भेदभावच आहे. आज काळ बदलतो आहे आणि बदलत्या काळात सर्वच अनैतिक गोष्टी बदलायला हव्यात हे तेवढंच खरं.

■ अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

## संकटकाळाचा साथी

आज आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. स्मार्टफोनमधल्या स्मार्ट फीचर्समुळे आपलं आयुष्य सुसह्य झालं आहे. संकटकाळीही स्मार्टफोन आपली मदत करू शकतो. अँड्रॉईडमध्ये इमर्जंसी लोकेशनचीही सोय आहे. स्मार्टफोनमध्ये इमर्जंसी सेवा सेट करता येतील. यासाठी स्मार्टफोनचं पॉवर बटण काही काळासाठी दाबून ठेवा. यानंतर स्क्रीनवर इमर्जंसी एसओएस फीचरवर टॅप करा. यानंतर स्मार्टफोन ११२ क्रमांकाला फोन लावेल. फोन लागल्यावर तो कट करा. यानंतर स्क्रीनवर खालच्या बाजूला मेडिकल इन्फॉर्मेशन हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. यात तुमची आरोग्यविषयक माहिती नोंदवता येईल. यानंतर डन हे बटण दाबा. यामुळे संकटकाळी तुम्हाला मदत मिळू शकेल.

## कस्टमर केअरला फोन

गुगलवर कस्टमर केअर नंबरचा शोधत असाल तर थोडं सावध व्हा. कारण सर्चमध्ये बनावट कस्टमर केअर नंबरही असू शकतो. या क्रमांकावर फोन केल्यास तुमची फसवणूक होऊ शकते. बनावट कस्टमर केअरचे प्रतिनिधी रिमोट ॲक्सेस ॲप्स डाउनलोड करायला सांगतात. या माध्यमातून तुमच्या स्क्रीनवर समोरची व्यक्ती नियंत्रण ठेऊ शकते. त्यामुळे कोणत्याही कस्टमर केअरशी संपर्क केल्यानंतर टीम व्कीक सपोर्ट, मायक्रोसॉफ्ट रिमोट डेस्कटॉप, एनी डेस्क रिमोट कंट्रोल, एअर ड्रॉइड रिमोट ॲक्सेस अँड फाईल, क्रोम रिमोट डेस्कटॉप, स्प्लॅशटॉप पर्सनल रिमोट डेस्कटॉप अशी ॲप्स डाउनलोड करायला सांगण्यात आली तर ती अजिबात करू नका.

## इलेक्ट्रिक बनी हॅट आणि शाल

थंडीच्या दिवसात कानटोप्या, मोजे, स्वेटर वापरले जातात. जाड पांघरून घेऊन गुडूप झोपावसं वाटतं. आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात या वस्तूही स्मार्ट झाल्या आहेत. ब्यूटूथ म्युझिक बनी हॅट खूपच आकर्षक आहे. या बिल्ट इन स्पीकर्सही आहेत. ही हॅट मोबाईल, संगणक वा लॅपटॉपला कनेक्ट करून गाणी ऐकता येतात. यूएसबी इलेक्ट्रिक हिटिंग शालही आहे. ही शाल धुता येते. याला डिटॅचेबल केबल आहे. ही केबल काढून तुम्ही शाल धुऊ शकता. यासोबत इलेक्ट्रिक हिटेड सॉक्स, इलेक्ट्रिक लंच बॉक्स, इलेक्ट्रिक फूट वॉर्मर अशा वस्तूही उपलब्ध आहेत. या वस्तूंमुळे थंडी सुसह्य होऊ शकते.

## वाढवा लॅपटॉपचा वेग

मित्रांनो, लॅपटॉप, कॉम्प्युटरशिवाय आपलं पानही हलत नाही. ऑनलाईन क्लास, वर्क फ्रॉम होममुळे तर ही उपकरणं आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून गेली आहेत. म्हणूनच लॅपटॉप, पीसी स्लो झाला की चांगलीच पंचाईत होते. आता स्लो झालेल्या पीसीची गती वाढवण्यासाठी मदत घेता येईल. सर्वात आधी नको असणारी, निरूपयोगी सॉफ्टवेअर्स डिलिट करून टाका. यासाठी कंट्रोल पॅनलमध्ये जाऊन अनइन्स्टॉल प्रोग्रामवर क्लिक करा. इथे तुम्हाला सॉफ्टवेअर्सची यादी दिसेल. तुम्ही वापरात नसणारी सॉफ्टवेअर्स डिलिट करू शकता. डिस्क क्लीन अप हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. तुमच्या लॅपटॉपमध्ये बराच डाटा सेव्ह करावा लागत असेल तर रॅम वाढवून घेता येईल. रॅम वाढवून घेतल्यानंतर पीसी वा कॉम्प्युटरचा वेग वाढू शकेल.

# शिक्षणाचा दिवा

लघुकथा





महाराष्ट्रातील एका दुर्गम भागातील छोटंसं गाव होतं मोरगाव. त्या गावातील लोकं कष्टाळू, परंतु शिक्षणापासून वंचित होती. गावातील बहुतेक लोक अक्षरशत्रू होते. अशा परिस्थितीत तिथे राहणारी १४ वर्षांची सुनंदा आपल्या कुटुंबासोबत राहत होती. तिच्या वडिलांचा शेतात कष्ट करणं हा एकमेव व्यवसाय होता, तर आई घरकाम सांभाळत होती.

सुनंदा जिद्दी होती. तिचं शिक्षण घेण्याचं स्वप्न मोठं होतं. पण गावात एकही शाळा नव्हती, आणि जवळच्या गावात जाण्यासाठी पाच किलोमीटर चालावं लागायचं. सुनंदाच्या वडिलांनी तिचं शिक्षण बंद करण्याचा निर्णय घेतला, कारण त्यांच्या मते मुलींनी घर सांभाळावं, शिक्षणाची काही गरज नाही.

एके दिवशी, सुनंदाने वडिलांशी चर्चा करण्याचा धाडस केलं. ती म्हणाली, "बाबा, शिक्षणाशिवाय जीवन अपूर्ण आहे. मला शिकायचं आहे, भविताव्याचा विचार करायचा आहे." वडिलांनी तिला डोळे वटारून उत्तर दिलं, "हे शिक्षणाचे फॅड सोडून दे. गावातल्या इतर मुलींसारखी घरात राहा आणि कामं कर."

सुनंदा निराश झाली, पण हार मानायची नव्हती. ती आपल्या आजीला भेटायला गेली. आजीने तिच्या डोळ्यातील झळाळी ओळखली आणि तिला धीर दिला. "मुली, जिद्दीने गावाचा चेहरामोहरा बदलू शकतो," असं आजीने सांगितलं.

सुनंदाने ठरवलं की, आपलं शिक्षण सुरू ठेवण्यासाठी ती स्वतः काहीतरी करेल. ती रोज पहाटे उठून शेतात वडिलांना मदत करायची आणि नंतर जवळच्या गावातील शाळेत जायची. पाच किलोमीटरचा प्रवास करताना तिला खूप अडचणींचा सामना करावा लागायचा. ऊन, पाऊस, रस्त्यावरील अडथळे. पण तिच्या जिद्दीपुढे या सगळ्या अडचणी फिक्या पडत होत्या.

शाळेत तिच्या मेहनतीमुळे शिक्षिका तिच्यावर विशेष लक्ष देऊ लागल्या. त्यांनी तिला पुस्तकं आणि वही पुरवली. सुनंदा इतर मुलांना शाळेत येण्यासाठी प्रोत्साहित करू लागली. "शिक्षणामुळे आपण आयुष्यात काहीतरी मोठं करू शकतो," असं ती सांगायची.

गावातील काही लोक तिच्या या प्रयत्नांना विरोध करत होते. "मुलींचं शिक्षण म्हणजे वेळेचा अपव्यय," असं ते म्हणायचे. पण सुनंदा त्यांच्याकडे दुर्लक्ष करत होती. तिचं ध्येय स्पष्ट होतं. शिक्षणाचा दिवा प्रत्येक घरात पेटवायचा.

एके दिवशी, शाळेतील मुख्याध्यापकांनी सुनंदाच्या कष्टाची दखल घेतली आणि तिच्या गावात शाळा उभारण्यासाठी गावकऱ्यांची सभा बोलावली. सुनंदाने त्या सभेत आपल्या मनातील विचार मांडले. "शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली आहे. आपण सर्वांनी मिळून शाळा उभारली, तर आपल्या पुढच्या पिढीचं आयुष्य उज्ज्वल होईल," असं ती म्हणाली.

सुनंदाच्या शब्दांनी गावकऱ्यांच्या मनाला चटका लावला. त्यांच्या डोळ्यांत आशेचा किरण दिसू लागला. काही दिवसांत गावातील लोकांनी एकत्र येऊन शाळा बांधण्याचा निर्णय घेतला. प्रत्येकाने आपल्या परीने योगदान दिलं. कोणी विटा पुरवल्या, कोणी मजुरी केली.

शाळा बांधून पूर्ण झाली, आणि सुनंदाच्या स्वप्नाला मूर्त स्वरूप आलं. गावातील इतर मुलं-मुली आता आनंदाने शाळेत जाऊ लागली. सुनंदा केवळ आपल्या शिक्षणासाठीच नाही, तर गावाच्या भविष्याला घडवण्यासाठीही प्रेरणा बनली.

आज मोरगावातील शाळा शिक्षणाचा दीपस्तंभ बनली आहे. सुनंदाच्या कष्टाने आणि जिद्दीने गावातील लोकांना शिक्षणाचं महत्त्व पटवलं. तिच्या या संघर्षाने एक नवा इतिहास रचला. शिक्षणाचा दिवा लावणारी सुनंदा गावासाठी प्रेरणास्थान ठरली आणि तिच्यामुळे गावाचा चेहरा-मोहरा बदलला.

■ सचिन चव्हाण
रामटेक, जि. नागपूर
मो. ९१५८३९३२६०

फुलराणी




# लाईफ पार्टनर



प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते आणि हेच स्त्रीच्याही बाबतीत लागू आहे. पती-पत्नीचे नाते संपूर्ण आयुष्यावर परिणाम करणारे असते. जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत जोडीदाराचीच साथ असते, बाकी नाती गौण ठरतात. कोणत्या कुटुंबात जन्म घेणे आपले हाती नाही. परंतु जीवनसाथी निवडणे आपले हाती आहे. लग्न ही भावी पिढीच्या निर्मितीची प्रथम पायरी आहे.

बरेचा वेळा करिअरच्या मागे लागून मुले/मुली लग्न लांबणीवर टाकतात. मिळवत्या मुलींचे पालकही बरेच वेळा बेफिकीर असतात. मुलांचे पालक-मुलाचा पगार २५ वरून ५० हजारांवर जाऊ द्या, मग पाहू! अजून चांगली स्थळे मिळतील, असे म्हणतात. अगदी वेगळी धाटणी असलेला जोडीदार मिळाला/मिळाली, तर मग मात्र आयुष्य अनेकदा निरस-बेचव होऊन जाते. याला महत्त्वाचे कारण ''उशीरा लग्न'' हेच असून, निराशपणे, कुठेतरी, घाईघाईनं लग्न उरकविणे हे आहे.

लक्षात ठेवा पसंत नसेल तर ३० हजाराचा टी.व्ही. फेकून द्याल, पसंत नसेल तर ३ लाखांची कार फेकून घाल. अनमोल जोडीदार फेकून देता येत नाही. बरेच वेळा मुले-मुली लग्न मला करावयाचे आहे. तुम्ही जास्त लक्ष देऊ नका, असे पालकांना सांगतात. लक्षात ठेवा, आई-वडील तुम्हाला, प्राणापलीकडे जपत असतात, सबब मुलीचे लग्न शिक्षण/नोकरीनंतर दोन वर्षांचे आत व मुलाचे लग्न तीन वर्षांच्या आत होणे आवश्यक आहे.

लग्नप्रसंगी तीन लाख खर्च करणारे पालक जोडीदार निवडीकरिता ३० हजारही खर्च करीत नाहीत. लग्न जुळले हे जाहीर होताच मुलगा-मुलगी व पालक यांचे लग्नातील बाजारमूल्य शून्य झालेले असते, त्यामुळे लग्नावर हॉल, डेकोरेशन, कॅटरिंगवर किती खर्च करता हे गौण ठरते. साध्या किंवा भपकेबाज लग्नाची चर्चा फक्त चार दिवसच असते. सबब जोडीदाराची निवड महत्त्वाची आहे. मुलां-मुलीचे पालक पाहणी झाल्यावर जर १५-२० दिवसांत काहीच निरोप झाला नाही तर त्यांना स्थळ पसंत नसेल, असा गैरसमज करून घेतात. मनात असते परंतु अधिक चांगल्या स्थळांचा मधल्या काळात शोध घेत असतात. म्हणून दुसरे स्थळ पक्के करताना अगोदरचे स्थळ जास्त चांगले वाटत असल्यास एकदा विचारायला काय हरकत आहे? नाहीतर अगोदरचे स्थळ अधिक चांगले होते, त्यांनी उशीर लावला ही टोचणी नेहमीकरिता राहते.

आजकाल मुलांचे पालक मुलींच्या पालकांशी सरळ विचारणा करतात. हा चांगला स्वागतार्ह बदल आहे. चांगल्या मुलाचे स्थळ मिळणे कठीण आहे. परंतु चांगल्या मुलीचे स्थळ मिळणे जास्त कठीण आहे. मुलाचे लग्नाचे वेळी पालक बरीच तडजोड करतात, परंतु तेच पालक मुलाचे वेळी तडजोड कमी करतात बरेच वेळा व्हेटो मुलाकडे असतो. कोणाच्याही वैवाहिक जीवनांचं यश ज्या अगदी मोजक्या गोष्टींवर अवलंबून असतं, त्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'तडजोड' होय.

आपण कोणाला पसंत करतो, याचबरोबर, आपल्याला कोण पसंत करतो, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. वधू-वर संशोधन करताना वास्तवाचे भान ठेवून आपल्या पाल्याचे रंग-रूप, उंची, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती याचा जाणीवपूर्वक विचार करून अवास्तव अपेक्षा न ठेवता जोडीदार निवडावा.

पूर्वी राजकन्येचे स्वयंवर व्हायचे, आजुबाजूचे राज्यांत दूत पाठविले जात. राजकन्या पतीची निवड करायची. तो हक्क राजकुमारांना नव्हता, आजची वधू-वर पुस्तके दूताचे काम करतात व वधू-वर परिचय मेळावे हे स्वयंवराचे आधुनिक स्वरुप आहे. येथे दोघांनाही योग्य जोडीदार निवडण्याची समान संधी आहे. हिंमत बांधा, वधू-वर परिचय पुस्तकांत नाव नोंदवा, परिचय मेळाव्यास हजर राहा, स्टेजवर या, परिचय द्या, जोडिदाराची निवड करा. पालकांना व संयोजकांना मोकळेपणा सांगा. ते पुढचे सांभाळून घेतील. लाईफ पार्टनर अर्था! आयुष्याचा जोडीदार निवडा व लाईफ प्रिझव्हर अर्थात जीवन रक्षक व्हा एकमेकांचे!

■ डॉ. वसंत श्रा. शिरभाते
नागपूर, मो. ९३२६८८६८३९

## समुपदेशन

### नकारात्मक विचार येतात

**मी** २० वर्षांचा तरूण आहे. शालेय जीवनापासूनच मी अभ्यासात हुशार आहे. पण सध्या माझं अभ्यासावरचं लक्ष उडालं आहे. मनात सतत नकारात्मक विचार येतात. सगळं सोडून दूर कुठे तरी जावं, असं वाटू लागलं आहे. मी काय करू

**उत्तरः** मित्रा, अभ्यासावरचं लक्ष उडण्यामागचं कारण तू स्पष्ट केलेलं नाही. तुला अपयश आलं आहे का असं असेल तर यामुळे घाबरून जाऊ नकोस. आयुष्यात कसोटीचे प्रसंग येत राहतात. त्याला पर्याय नाही. नकारात्मकता दूर ठेवण्याचा प्रयत्न कर. अभ्यासाकडे लक्ष दे. प्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठी समुपदेशकाची मदत घे. आयुष्यात कधी-कधी नैराश्याचे प्रसंग येतात. हेच प्रसंग आपल्याला सक्षम बनवत असतात. त्यामुळे मनाला कणखर बनव आणि अभ्यासात मन रमव. आवडीच्या गोष्टी कर.

### नातं योग्य आहे का

**मी** २७ वर्षांची तरूणी असून, पाच वर्षांनी लहान असलेल्या मुलाच्या प्रेमात पडले आहे. आम्ही शेजारी आणि बालपणीचे मित्र आहोत. आमच्या घरच्यांना हे नातं मान्य होणार नाही, याची मला कल्पना असली तरी या नात्याला एक संधी द्यावी, असं मला वाटतं. दुसरं म्हणजे तो फक्त २२ वर्षांचा असून, मास्टर्स अभ्यासक्रमाची तयारी करत आहे. वयातल्या अंतरामुळे भविष्यात काही समस्या निर्माण होतील का ? मी खूप गोंधळून गेले आहे.

**उत्तर** : बराच काळ एकत्र घालवल्यानंतर एखाद्याबद्दल आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. पण हे फक्त आकर्षण आहे का प्रेम, हे जाणून घे. त्यातच त्याला तू आवडतेस किंवा नाही याबद्दल निश्चित असं काहीच सांगता येत नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे बोल. अवघा २२ वर्षांचा हा मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर झालेला नाही. भविष्याचा विचार सध्या तरी करू नकोस. सद्यस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न कर. नात्यात समर्पण आणि विश्वासाची गरज असते.

# विविध पैलूंवर प्रकाश टाकणारा ‘चांदणवेल’

## लोकसमीक्षा



नुकताच कवी गणेश पांडे यांचा चांदणवेल हा चारोळी संग्रह वाचनात आला. चारोळी संग्रह वाचत असताना त्यातील जाणवलेल्या काही ठळक बाबी, ज्यातून या चारोळी संग्रहाच्या अंतरंगाचा वेध आपल्याला घेता येतो व काही महत्त्वाचे पैलू जे या चारोळी संग्रहाचे मर्म व वर्म आपल्याला सांगून जातात, त्यांचा हा शब्दरूपी आलेख.

चांदणवेल या चारोळी संग्रहात एकूण २१५ चारोळ्या आहेत व या सर्व चारोळ्या कुण्या एका विषयाशी संबंधित नसून, मानवी जीवनाशी निगडित असलेल्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत, ज्यात सुख, दुःख, सत्य, असत्य, शत्रू, मित्र, पशू, पक्षी, प्रेम, प्रणय, सौंदर्य, फुले, पाने, वृक्ष,वेली, निसर्ग, पर्यावरण, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय, ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान हे विषय कुठल्या न कुठल्या संदर्भाने त्यांच्या चारोळ्यांमधे प्रतिबिंबित होतांना आपल्याला दिसतात. सोबतच कवीच्या अंतरंगातील नाजूक हळव्या व तरल भावनांचे प्रतिबिंब या चारोळ्यांमधे पडलेले आपल्याला अनुभवायला येते. कवीच्या व्यक्तीमत्त्वाचा आरसा होऊन त्याच्या भावविश्वाचे नानाविध व अव्यक्त पैलुंचे दर्शन घडविणारे जणू काव्यदर्पणाचा प्रत्यय या चारोळ्या आपल्याला देतात. या चारोळी संग्रहातील काही लक्षणीय चारोळ्या निश्चितच याची प्रचिती आपल्याला देतात. जसे की,

विखुरलेली माझी रंगीत स्वप्ने
डोळ्यात अजुनी साठली आहे
तु येशील पुन्हा परतुन कधी
अंतरात आस दाटली आहे


बेभान बरसणारा पाऊस
अन् तू चिंब भिजलेली
थेंबा-थेंबात न्हाऊन कशी
अंगभर ओली सजलेली

हा गाव नवा मित नवे
मी गातो आता गीत नवे
विसरून त्या स्मृती जुन्या
क्षितीज पाहतो नित नवे

या व अशा प्रकारे चारोळी संग्रहातील सर्वच २१५ चारोळ्या आपापल्या परीने आशयघन व आपले वेगळेपण जपणाऱ्या व एका दीर्घ कवितेइतकाच समर्पक व यथोचित अर्थ व आशय सांगण्याइतपत समर्थ आहेत. चारोळी संग्रहाच्या अंतरंगात विहरतांना रसिकांना निश्चितच याची पुरेपूर प्रचिती येईल. चांदणवेल चारोळी संग्रहाचे प्रकाशक श्री राघव प्रकाशन, नागपूर हे असून मुखपृष्ठ अतिशय बोलके, लक्षवेधी व तेवढेच सुंदर व समर्पक आहे. चारोळी संग्रहाला कवी राम भोंडे ‘शांतेय’ यांची अभ्यासपूर्ण व यथोचित प्रस्तावना लाभली असून, लेखिका विजया ब्राह्मणकर व नागपूरच्या रसिकराज या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व साहित्यिक बळवंत भोयर यांच्या शुभेच्छा या चारोळी संग्रहाला लाभलेल्या आहेत. चांदणवेल हे गणेश पांडे या पेशाने विद्युत अभियंता असलेल्या कवीची तिसरे साहित्यिक अपत्य आहे. जीवनगाणे व माझा कवितेचा गाव या दोन काव्यसंग्रहांनंतर काव्य रसिक त्यांच्या या चांदणवेल चारोळी संग्रहाचे उस्फुर्तपणे स्वागत करतील व आपला भरभरुन प्रतिसाद देतील व कवीच्या स्वप्नांतील चारोळी रुपी चांदण्यांच्या या चांदणवेलच्या रुपेरी प्रभेत न्हाऊन निघतील अशी खात्रीआहे.

काजळ काळ्या रात्रीवर
नक्षी चांदण्यांनी काढलेली
रुपेरी चांदणवेल जशी
उंच गगनावरी वाढलेली .

■ **वीणा पांडे**
नागपूर
मो. ९६५७४४५९९५




चांदणवेल

| | | |
|---|---|---|
| कवी | : | गणेश पांडे (मो. ९५०३३५०५७४) |
| प्रकाशक | : | राघव पब्लिशर्स, महाल, नागपूर |
| पृष्ठ संख्या | : | ६३ |
| मूल्य | : | रुपये १२५/- |

## लेखकांसाठी सूचना

**लोकशाही वार्ताने ‘प्रतिबिंब’ पुरवणीत ‘लोकसमीक्षा’ या स्तंभांतर्गत पुस्तक समीक्षा/पुस्तक समीक्षणाचा स्तंभ सुरू केला आहे. लेखकांनी त्यांच्या पुस्तकाचे समीक्षण lokshahivartapratibimb@gmail.com या इमेलवर शक्य असल्यास युनिकोडमध्ये किंवा पुढील पत्यावर पाठवावे. योग्य समीक्षणास प्रसिध्दी देण्यात येईल. पुस्तक किमान दोन महिन्यात प्रसिध्द झालेले असावे. लिफाफ्यावर ‘लोकसमीक्षा’ स्तंभासाठी असा उल्लेख करावा. समीक्षणासाठी पुस्तक अनिवार्य राहील.**

**‘प्रतिबिंब’मध्ये** लिहिणाऱ्या सर्व लेखकांचे स्वागत आहे. रविवार पुरवणीचे नवे-बदललेले स्वरुप आपल्याला आवडले असेल, असा विश्वास वाटतो. आपले लेख, ललित, लघुकथा, हास्यकथा तसेच पर्यटन, दिन विशेष या सदराअंतर्गत साहित्य जास्तीत जास्त ६०० शब्दांपर्यंत पाठवायचे आहे. अंकाबाबत आपला अभिप्राय, प्रतिसाद आम्हाला आवर्जून कळवा. आमचा पत्ता: lokshahivartapratibimb@ gmail.com जे लेखक आपले लेख ‘ई-मेल’द्वारे पाठवतात, त्यांनी ४ सी वा ‘युनिकोड’ फाँटमध्ये पाठविल्यास ते अधिक सोईचे होईल. तेव्हा शक्यतोवर या फाँट्समध्ये पाठविण्याचा प्रयत्न करावा, ही विनंती. अर्थात श्री लिपीमध्ये लेखन पाठविणाऱ्यांचेही स्वागतच आहे. जे लेखक टपालाने आपले साहित्य पाठवू इच्छितात, त्यांनी मूळ हस्तलिखिताची प्रत पुढील पत्त्यावर पाठवावी, ही विनंती.

:: आमचा पत्ता ::
संपादक, प्रतिबिंब, लोकशाही वार्ता,
थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह-२, १४८,
युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ,
नागपूर-४४००१०

## बाल विहार



# कोल्हा आणि द्राक्षे

एक भुकेलेला कोल्हा फिरत-फिरत एका द्राक्षाच्या मांडवाखाली आला. वर पाहतो तर सुंदर पिकलेले द्राक्षांचे घड लागले आहेत. पण मांडव उंच असल्यामुळे ते त्याला हाती लागेनात. त्याने खूप उड्या मारल्या. पण एकही द्राक्ष त्याला मिळाले नाही. मग थोडे दूर जाऊन द्राक्षाकडे बघत तो म्हणाला, ‘‘ही द्राक्षे ज्याला कोणाला



हवीत त्याने घ्यावी. पण ती हिरवी अन् आंबट आहेत म्हणून मी सोडून जातो.’’

**तात्पर्य** : एखादी वस्तू आपल्याला मिळाली नाही म्हणजे आपला कमीपणा लपवून त्या वस्तूलाच दोष देणारे बरेचजण असतात.

## अस्वल आणि मधमाशा



**एका बागेत** एक मधमाशांचे पोळे होते. त्यातला मध खाण्यासाठी एक अस्वल तेथे गेले. त्याने त्या पोळ्याला तोंड लावले व आता मध पिणार, तोच सगळ्या मधमाशा त्याच्यावर तुटून पडल्या व त्याच्या नाका-तोंडावर चावून त्याला अगदी सतावून सोडले. त्यामुळे ते अस्वल इतके वेडावल्यासारखे झाले की रागाच्या भरात त्याने स्वतःच्या डोक्याची कातडी स्वतःच्या पंजाने फाडून टाकली.

**तात्पर्य** : प्राणिमात्राच्या संतापाचा अतिरेक झाला की त्या भरात तो स्वतःलाही इजा करून घेण्यास कमी करत नाही.

## मासा व साप

**वांव या** नावाचा एक मासा आहे. त्याचा आकार सापासारखा असतो. त्या जातीचा एक मासा एकदा एका सापाला म्हणाला, ‘‘अरे, तुझा नि माझा आकार इतका सारखा आहे की, त्यावरून तुझं आणि माझं नक्की काहीतरी नातं असलं पाहिजे असं मला वाटतं. पण लोक मलाच तेवढं पकडून नेतात, पण तुझ्या वाटेला कोणीही जात नाही. याचं कारण काय?’’ साप त्यावर म्हणाला, ‘‘मित्रा, याचं कारण असं की लोक माझ्या वाटेला गेले तर मी त्यांना उलट अशी शिक्षा करतो की त्यामुळे त्यांना चांगलीच आठवण राहावी.

## देवाजवळ तक्रार

**लोक आपल्याला** विनाकारण त्रास देतात व छळतात अशी एक सापाने देवाजवळ तक्रार केली. ती ऐकून देव त्याला म्हणाला, ‘‘अरे, ही तुझीच चूक. ज्याने तुला त्रास दिला त्याला तू कडकडून चावला असतास तर इतर लोक तुझ्या वाटेला गेले नसते.’’

**तात्पर्य** : आपल्याला त्रास देणाऱ्या एका माणसाला क्षमा केली तर दुसरी माणसंही आपल्याला त्रास देतात. यासाठी पहिल्यापासून सावध राहावे.

## काटे खाणारे गाढव

**एका कुंभाराचे** गाढव पाठीवर खाण्याचे पदार्थ घेऊन शेतात मालकाकडे चालले होते. जात असता वाटेत एक लहानसे बाभळीचे झुडूप त्याला दिसले. त्याचे कोवळे काटे व पाने खाण्यासाठी तो थोडा उभा राहिला व खात असता स्वतःशीच म्हणाला, ‘‘माझ्या पाठीवर खाण्याचे इतके पदार्थ असता ते सोडून मी हे काटे खातो आहे हे पाहून लोकांना नवल वाटेल यात संशय नाही.’’

**तात्पर्य** : प्रत्येकाची आवड निराळी असते.

## आजारी सांबर

**एक सांबर** आजारी पडले असता चरायच्या कुरणात कोपऱ्यात स्वस्थ पडून राहिले. त्या कुरणात चरणारे त्याचे मित्र व इतर प्राणी त्याला भेटायला येत. त्यापैकी प्रत्येक प्राणी त्याच्या पुढे ठेवलेल्या गवतापैकी काही गवत खाऊन जात असत. असे होता होता, ते गरीब बिचारे सांबर मरण पावले. पण ते आजारपणाने मरण न पावता त्याला भेटायला येणाऱ्या प्राण्यांनी त्याच्यापुढील सगळे गवत खाऊन टाकल्याने उपासमारीमुळे मेले.

**तात्पर्य** : दुष्ट मित्र हितापेक्षा अहितच जास्त करतात. ■





## रस्ते

संपूर्ण ही सांगूनी काही
मनामध्ये दडपुनी राही
चालणे सोबती ठरले होते
रस्ते मात्र कळले नाही
भास सारे अनुभवत गेलो
भार मात्र उरला नाही
शब्दांमधले गूढ सारे
मनीअंतरी अवतरले नाही

उमटतं गेली ठसे पाऊले
बिंब तेवढेचं सोडतं गेलो
कळले आपुले अस्तित्व तेव्हा
जगणे मात्र हरवुनी गेलो
अशी उमलतं गेली नाती
वाटे लपेटून घ्यावी तेव्हा
स्मित हास्य अनं त्या भावना
ओंजळी आपुल्या यावी पुन्हा

अंतरातले अंतर बघता
मनगात्र ही दाटुनी जायी
संपूर्ण ही सांगुनी काही
मनामध्ये दडपुनी राही
मुक्तपाखरू भिरभिरणारे
आपण असेही होतो काही
चालणे सोबती ठरले होते
रस्ते मात्र कळले नाही

■ राकेश खलासने
रा. कुंभापूर, ता. मौदा
जि. नागपूर-४४११०६
मो. ९६२३३४२४९२

## तू गेलीस पुढे

तू गेलीस पुढे
जीव तळमळत राहिला.
अंधाऱ्या खोलीत तो
हुंदका आवरत राहिला.

इवल्याशा घराला तिने
स्वर्गाहून सुंदर ठेवले.
तडजोड करत तिनं
संसार सुखाचा ठेवला.
तू गेलीस पुढे
जीव तळमळत राहिला.

उतारवयात हात सुटतांना
तो दिव्यासम जळत राहिला.
कापऱ्या हाताने फोटोवरून
तो हात फिरवत राहिला.
तू गेलीस पुढे
जीव तळमळत राहिला.

जुन्या आठवणींत रमताना
तो तसाच स्तब्ध झाला.
फोटो छातीवर ठेवून त्याने
जणू काही तिने निरोप धाडला.
तू गेलीस पुढे
जीव तळमळत राहिला.

■ सुधाकर मानवतकर
बुलडाणा
मो. ७२७६९७५५१४३



## कां करावं असं कुणी?

कां करावं असं कुणी, काही कळत नाही
माझं भलं होत राहवं, बाकी वळत नाही
कुणी सांगतं छान खरं, तेही रुचत नाही
मी म्हणतो ना तेच खरं, दुसरं पटत नाही

माहीत आहे या जगी, वेगळं कुणी नाही
एकच आहोत माणसं, परकं कुणी नाही
त्याचं व्हावं चांगभलं, जर भावना नाही
होईल सारं ठीकठाक, सांगता येत नाही

बरं असेल ठीक तरी, किंमत होत नाही
जग म्हणेल तू स्वार्थी, तुझी गरज नाही
प्रशंसा करायलाही, कुणी मिळत नाही
जगायला जीवनातच, अर्थ राहत नाही

देवही अशाच्या मागं, ढुंकून पाहत नाही
म्हणतो तुझं तूच बघ, मलाही वेळ नाही
कशासाठी तू जगतोय, हेच कळत नाही
कां तुझं कुणासाठी, मन कळवळत नाही

चार-चौघांशिवाय अरे, जग चालत नाही
तिरडीवरचा देह तोही, नेता येत नाही
ठेवा लागतं सारं इथंच, काही येत नाही
कृत्याचा होतो हिशेब, यात माफी नाही

■ संजयात्मन्
मेन रोड, नंदनवन, नागपूर
मो. ९४२२८०३०२२

## चोरबाजार

मनाच्या चोरबाजारी कधीचा हिंडतो आहे
हरवला चेहरा माझा तिथे मी शोधतो आहे

कुठे पोहोचतो रस्ता कुणा ठाऊकही नाही,
तरी गर्दीसवे आम्ही युगाचे चालतो आहे

उजेडाला उधळणारा कुणीही राहिला नाही,
इथे अंधार दिवसाही किती फोफावतो आहे

जरी जखमाच झालेल्या हरेकाच्या जिव्हाळ्याने
तरीही पण जिव्हाळ्यावर नव्या मी थांबतो आहे

असा आजार जडलेला जगाच्या वेगळा मजला
इलाजानेच त्याच्या तो पुन्हा सोकावतो आहे

■ संदीप वाकोडे
मूर्तिजापूर, जि.अकोला
मो. ९५२७४४७५२९



## काव्यफुले



## डोळ्यात उन्हाळे

डोळ्यात उन्हाळे इथे ठायी ठायी
मोकाटल्या गायी कळेना भलाई!
सांग आभाळाला बा दे रे उःशाप
माणसाचे पाप मातीला संताप!

मूक माणसांची मूक ही वेदना
जागवू दे मना खरी संवेदना!

आई पाखरांचा तुटला निवारा
पिलांना निखारा विस्तवच चारा!

होरपळ झाली पंखात ना बळ
काळजात कळ शोधताना तळ!

सावलीचे झाड कुठे शोधू आई
गाण्यात अंगाई ऐकू येत नाही!

■ शशी त्रिभुवन
मो. ८२७५०३२८९७

## कर फक्त कर्म

काय झाले वेड्या । कसा वागतोस?
काय बघतोस । मुकाट्याने?

दुसऱ्यांचे पाप । आपलेच पुण्य
कर्म असो शून्य । तरीपण

काय थोरपण । घेऊन बसला?

गर्वात जगला । नित्यनेमे
क्षणचाही कुठे । आहे भरवसा?
जसा आला तसा । जाणारही

कर्म तुझे जरी । नाही दिसणार
पण राहणार । खूणगाठ

कर फक्त कर्म । अपेक्षारहित
वेड्या नियमित । धर्म पाळ

दुसऱ्याची ताई । अथवा आपली
पाहिजे हसली । जगताना

नको बघू तिला । वाईट दृष्टीने
निर्मिले सृष्टीने । तिलापण

■ अजय रमेश चव्हाण
तरनोळी, ता. दारव्हा, जि. यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

## करिअर दिशा



# स्मार्ट घरांसाठी मस्त पर्याय

होम ऑटोमेशन वा घराचं यांत्रिकीकरण ही संकल्पना भारतात आत्ता कुठे मूळ धरू लागली आहे. त्याचा वटवृक्ष व्हायला वेळ लागेल. सध्या काही श्रीमंतांच्या घरीच हे तंत्रज्ञान पहायला मिळतं. घरातल्या प्रत्येक उपकरणावर नियंत्रण मिळवून देणारी ही प्रणाली अद्याप सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलेली नाही. पण राजस्थानच्या प्रांजल कचोलियाने हे शिवधनुष्य पेललं आणि लाखो रुपयांची ही प्रणाली अवघ्या काही हजारांमध्ये उपलब्ध करून दिली.

घरातून बाहेर पडून बरेच दूर गेल्यावर दिवा, पंखा, टीव्ही सुरू राहिल्याचं आपल्या लक्षात येतं. मग स्वतःचाच राग येतो. अशा वेळी शेजाऱ्यांना सांगावं लागतं. पण तोही पर्याय नसेल तर काय करायचं? प्रत्येकानेच ही परिस्थिती कधी ना कधी अनुभवलेली असते. राजस्थानच्या प्रांजल कचोलियाने यावर प्रभावी उपाय शोधला. घराबाहेर असतानाही तुम्ही घरातले सुरू राहिलेले दिवे, पंखे एका ॲपच्या मदतीने बंद करू शकता. घरांचं यांत्रिकीकरण ही संकल्पना परदेशात बरीच लोकप्रिय ठरली असली, तरी भारतातला तिचा आवाका मर्यादितच आहे. या तंत्रज्ञानासाठीचा प्रचंड खर्च हे यामागचं मुख्य कारण आहे. घरात ही प्रणाली बसवून घ्यायची तर किमान ८ ते १० लाख रुपये खर्ची पडतात. अर्थातच सर्वसामान्यांना हा खर्च परवडणारा नसतो. म्हणूनच प्रांजलने ईडन स्मार्ट होम्स हे स्टार्टअप सुरू केलं. प्रांजल आयआयटी दिल्लीमधून इंजिनीअरींग केलं असून, या स्टार्टअपच्या माध्यमातून त्याने परवडणाऱ्या दरातली स्मार्ट होम प्रणाली विकसित केली आहे.



**घराबाहेर असतानाही तुम्ही घरातले सुरू राहिलेले दिवे, पंखे एका ॲपच्या मदतीने बंद करू शकता. घरांचं यांत्रिकीकरण ही संकल्पना परदेशात बरीच लोकप्रिय ठरली असली, तरी भारतातला तिचा आवाका मर्यादितच आहे. या तंत्रज्ञानासाठीचा प्रचंड खर्च हे यामागचं मुख्य कारण आहे. घरात ही प्रणाली बसवून घ्यायची तर किमान ८ ते १० लाख रुपये खर्ची पडतात. अर्थातच सर्वसामान्यांना हा खर्च परवडणारा नसतो. म्हणूनच प्रांजलने ईडन स्मार्ट होम्स हे स्टार्टअप सुरू केलं आहे.**

शिकत असताना सुटीत कोट्याला आपल्या घरी आला असताना प्रांजलने होम ऑटोमेशन विक्रेत्याची भेट घेतली. ही प्रणाली ३ बीएचके घरात बसवण्यासाठीचा खर्च ८ ते १० लाख रुपयांच्या घरात होता. अनेकजणांना भेटल्यानंतर तो खूपच निराश झाला. पण यातूनच त्याला व्यवसायाची उत्तम संधी गवसली. आयआयटीत परतल्यानंतर त्याने संशोधनाला सुरुवात केली. या क्षेत्रात काम केलेल्या इंजिनीअर्सची टीम उभी केली. मग त्याच्या टीमने एक उत्पादन तयार केलं. हे उत्पादन सध्या उपलब्ध तंत्रज्ञानाच्या तुलनेत बरंच उजवं तसंच किमतही खूप कमी असल्याने सर्वसामान्यांना परवडणारं होतं.

ही प्रणाली घरातल्या स्वीचबोर्डसच्या मागे बसवता येते. यामुळे एका स्मार्टफोन ॲपच्या माध्यमातून तुम्ही घरातली सगळी यंत्रं नियंत्रित करू शकता. ही प्रणाली बसवण्यासाठी घरातलं वायरिंग बदलण्याची गरज नसते. सूचनापत्र वाचून कोणताही इलेक्ट्रिशियन ही प्रणाली बसवून देऊ शकतो. प्रणाली बसवण्यासाठी फक्त पंधरा मिनिटं पुरतात. ॲपवर यंत्र बंद झाली वा नाही याची सूचना लगेच उपलब्ध होते. त्यामुळे तुम्ही निश्चित मनाने बाहेर जाऊ शकता. यासोबतच या प्रणालीची इतरही बरीच वैशिष्ट्ये आहेत. विशेष म्हणजे याचा खर्च अवघा ९० हजार रुपये आहे. ईडन स्मार्ट होम्सला केंद्र सरकारचं पाठबळ लाभलं आहे. सरकारच्या स्टार्टअप इंडिया कार्यक्रमासाठीही ईडन स्मार्ट होमची निवड झाली होती. प्रांजलचं हे तंत्रज्ञान देशातल्या स्मार्ट होम संकल्पनेला बळ देईल, अशी आशा आहे.

■ प्राजक्ता सराफ



# सुरक्षा स्मार्टफोनची!

**स्मार्टफोनने आपली अनेक कठीण कामे सोपी केली आहेत, पण यासोबतच घोटाळेबाज आणि सायबर गुन्हेगारांना लोकांची फसवणूक करण्याचा एक स्मार्ट मार्गही दिला आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण याविरोधात कठोरतेने काम करत असते. 'ट्राय'ने अलीकडच्या काळात फ्रॉड आणि ऑनलाईन फसवणूक यापासून वाचण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. जिओ, एअरटेल, व्हीआय आणि बीएसएनएलने ट्रेसिबिलिटी नियम लागू केल्यास ओटीपी मेसेज येण्यास वेळ लागू शकतो.**

### फोन स्वच्छ करताय?

आपल्या स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अनेक रोगजंतू असू शकतात. अनेकजण सॅनिटायझरने फोनचा स्क्रीन स्वच्छ करतात. मात्र अशा पद्धतीने फोनचा स्क्रीन स्वच्छ करताना काळजी घ्यायला हवी. अन्यथा तुमचा फोन खराबही होऊ शकतो. स्मार्टफोन स्क्रीन अत्यंत नाजूक अशा घटकांपासून तयार करण्यात आलेला असल्यामुळे अल्कोहोलयुक्त सॅनिटायझरमुळे त्यावरील कोटींग निघू शकतं. याच कोटींगमुळे फोनच्या स्क्रीनचं पाणी तसंच तेलापासून बचाव होतो. यासोबतच स्मार्टफोनच्या जॅक्सनाही द्रव पदार्थांनी स्वच्छ करू नये. द्रवामुळे हे जॅक खराब होऊ शकतात.

### धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

ऑनलाईन शॉपिंग ही आता सर्वसामान्य बाब बनली आहे. विविध साईटवरून ऑनलाईन खरेदी केली जाते. मात्र अशा पद्धतीने खरेदी करताना फसवणूक होण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं. सध्या फेक डिलिव्हरी वा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट वा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स वा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून राहायला हवं.

### धोकादायक ॲप्स

गूगलने प्ले स्टोअरमधून २२ ॲप्स डिलिट केली आहेत. या धोकादायक ॲप्समुळे युजर्सचा डाटा चोरीला जाऊ शकतो. तुमच्याकडे यातली काही ॲप्स असतील तर ती लगेच डिलिट करून टाका. कोणती आहेत ही ॲप्स? स्पार्कल फ्लॅशलाईट, स्नेक अटॅक, मॅथ सॉल्व्हर, शेप सॉर्टर, झोंबी किलर, टेक अ ट्रिप, स्पेस रॉकेट, निऑन पाँग, जस्ट फ्लॅशलाईट, टेबल सॉकर, जेली स्लाईस, ॲनिमल मॅच यापैकी काही ॲप्स तुमच्याकडे असतील तर फोनमध्ये ठेऊ नका.

### फ्रॉड आणि ऑनलाईन फसवणूक

स्मार्टफोनने आपली अनेक कठीण कामे सोपी केली आहेत. पण यासोबतच घोटाळेबाज आणि सायबर गुन्हेगारांना लोकांची फसवणूक करण्याचा एक स्मार्ट मार्गही दिला आहे. पण भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण याविरोधात कठोरतेने काम करत असते. ट्रायने अलीकडच्या काळात फ्रॉड आणि ऑनलाईन फसवणूक यापासून वाचण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. जिओ, एअरटेल, व्हीआय आणि बीएसएनएलने ट्रेसिबिलिटी नियम लागू केल्यास ओटीपी मेसेज येण्यास वेळ लागू शकतो. तुम्ही बँकिंग वा रिझर्व्हेशनसचे काम करत असाल, तर तुम्हाला ओटीपी मिळण्यास वेळ लागू शकतो.

### अकाउंट हॅक झालंय?

सध्या अकाउंट हॅक होण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. फेसबुक, इन्स्टाग्रामसारखी सोशल नेटवर्किंग ॲप्स हॅक होऊ शकतात. म्हणूनच आपण काळजी घ्यायला हवी. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी इन्स्टाग्रामची मूळ कंपनी मेटाने नवं व्यासपीठ सादर केलं असून, यामुळे युजर्सना हॅक झालेली खाती परत मिळवता येणं शक्य होणार आहे. इन्स्टाग्रामवर युजर्स बनावट क्रिप्टोकरंसी रिटर्न्सच्या माध्यमातून युजर्सना लुभावण्याचं काम करतात आणि त्याद्वारे त्यांच्या खात्यावर ताबा मिळवतात. इन्स्टाग्राम डॉट कॉम/ हॅक्ड नावाचं हे व्यासपीठ असून त्यावर खातं हॅक झाल्याची तक्रार नोंदवता येऊ शकते. या नव्या व्यासपीठावर खात्याच्या सुरक्षेसंबंधीची सगळी टूल्स उपलब्ध असून या माध्यमातून युजर्सची खाती सुरक्षित ठेवणं शक्य होणार आहे.

## टेक्नो टॉक

### या बगपासून सावध राहा

स्मार्टफोन आपल्या आयुष्याचं अविभाज्य अंग बनून गेला आहे. बरेच आर्थिक व्यवहार स्मार्टफोनच्या माध्यमातून केले जातात. याच कारणामुळे हॅकर्स स्मार्टफोनला लक्ष्य करतात. एका बगमुळे स्मार्टफोन युजर्सची माहिती लीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्ट्रँडहॉग नावाचा हा बग तुमची महत्त्वाची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचवू शकतो. काही ॲप्सच्या माध्यमातून हा बग स्मार्टफोनमध्ये प्रवेश करतो आणि हॅकर्स आपला कार्यभाग साधून मोकळे होतात. त्यामुळे प्रत्येकाने जागरूक रहाणं गरजेचं आहे.

### मोफत वायफाय सेवा वापरताना

विमानतळ वा अन्य ठिकाणी मोफत वायफायची सेवा उपलब्ध असते. मात्र या वायफायचा वापर करणं धोक्याचं ठरू शकतं. तुम्ही हॅकर्सच्या जाळ्यात अडकू शकता. मात्र तुम्ही मोफत वायफाय सेवेचा वापर सुरक्षित पद्धतीने करू शकता. यासाठी मोबाईलच्या सेटिंग्जमध्ये जा. मग वायफायवर क्लिक करा. यानंतर खालच्या बाजूला स्क्रोल करून ॲडव्हान्स सेटिंग्जमध्ये जा. इथे स्कॅनिंग ऑलवेज ॲव्हेलेबल हा पर्याय दिसेल. हे फीचर सुरू करा. यामुळे वायफायचा वापर करताना स्कॅनिंग होईल आणि तुमचा फोनही सुरक्षित राहील. ■

## राशिभविष्य



(रविवार १९ जानेवारी ते शनिवार २५ जानेवारी २०२५)

### मेष : प्रगतीच्या संधी

कौटुंबिक समाधान आणि आनंद देणारे प्रसंग घडतील. अपेक्षित घडामोडी घडून नोकरदारांना प्रगतीच्या संधी उपलब्ध होतील. कुटुंबासह करमणूक, कला किंवा हौसमौज यांचा आनंद घ्याल. बुद्धीजीवी एखादी चमकदार कामगिरी करू शकतील. बौद्धिक क्षेत्रात तुमचा दबदबा कायम असला, तरी तुमच्या बोलण्यातील अतिस्पष्टता इतरांना दुखावण्याची शक्यता आहे.

### वृषभ : परिश्रमाने यशप्राप्ती

दैनंदिनीतील नियमितपणा तुमचे आरोग्य समाधानकारक ठेवेल. नोकरीत हितचिंतकांच्या मदतीने संभाव्य अडचणींवर तुम्ही मात करू शकाल. गुरुवार यशदायी ठरेल. आपले बोलणे संतुलित ठेवल्यास गैरसमज टाळता येतील. अंगिकारलेल्या उपक्रमात तुमच्या परिश्रमाने अपेक्षित यशप्राप्ती होऊ शकते. मानसिक संतुलन साधून नियोजन केल्यास उत्तरार्धातील तुमची वाटचाल अधिक सुकर होईल. सप्ताहाचा शेवट अधिक कार्यक्षमतेचा आहे.

### मिथुन : नव्या गोष्टींची खरेदी

व्यय स्थानातील गुरू लहरी आणि भावनिक खर्चाचे प्रमाण वाढवेल. राहणीमानात बदल करण्यासाठी नवनव्या गोष्टींची खरेदी कराल. कौटुंबिक आघाडीवर सामंजस्याने शांतता राहील. श्रद्धेत आणि धर्मकृत्यात कर्मठपणा येणार नाही याची काळजी घ्या. गुरुवारी शब्दिक कोलांटउड्या मारण्याची मौज अनुभवलीत, तरी टीका टोमणे मारणे, मात्र मोठे गैरसमज निर्माण करण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या शेवटी स्वतःच्या श्रीमंतीचे अनावश्यक प्रदर्शन कराल.

### कर्क : मानसन्मान लाभेल

विविध प्रकारे तुमच्या इच्छांना वास्तव लाभणार आहे. प्रतिष्ठा आणि मानसन्मान लाभेल. तुमच्या राशीतील मंगळ स्पष्टोक्तीचा अतिरेक करण्याची शक्यता आहे. वैयक्तिक पातळीवरील चेष्टा-मस्करी यावर शब्दांचे योग्य नियंत्रण ठेवा. शब्दांची धार वाढण्याची शक्यता आहे. शेअर बाजारातील उलाढाली समाधानकारक राहतील. सप्ताहांती भोगवादी वृत्ती बळावेल.

### सिंह : कौटुंबिक आघाडीवर शांतता

कार्यातील सहजतेने नोकरदार विविध उपक्रमात सहभागी होतील. तुमचे विचार आणि मतांना अपेक्षित प्रतिसाद मिळेल. कौटुंबिक आघाडीवर सामंजस्याने शांतता राहील. पत्नीच्या नाराजीची दखल घेणे अनिवार्य राहील. मतभेदांवर तीव्र प्रतिक्रिया देणे टाळा. विशेषतः गुरुवारी एखाद्या व्यक्तीशी मोठे वाद संभवतात. सप्ताहाच्या शेवटी हौस-मौज कराल. व्यसनाधीनता, मात्र टाळा.

### कन्या : भौतिक सुखे लाभतील

धार्मिक, कौटुंबिक आणि सामाजिक स्वास्थ्य, प्रतिष्ठा आणि यथायोग्य मानसन्मान लाभतील. अडचणींवर मात करताना इतरांना शब्दांनी दुखविण्याचे टाळा. शेअर बाजारात डोळसपणे काम केल्यास तुमच्या अपेक्षा जरूर पूर्ण होतील. उत्तरार्ध साहित्यिकांना अनुकूल राहील. सप्ताहाचा शेवट व्यावसायिक आणि भौतिक सुखे लाभण्याचा आहे.

### तुला : करमणुकीचा आनंद घ्याल

आरोग्य आणि स्वास्थ्याबाबत वैद्यकीय सल्ला घेण्याची जरूर भासेल. संततीविषयक समस्यांमध्ये नव्याने लक्ष घालावे लागेल. व्यावसायिक समस्यांकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. गुरुवारी कौटुंबिक गैरसमजातून वातावरणात तणाव राहतील. आपला राग आणि नाराजी व्यक्त करण्याची ही वेळ नव्हे हे ध्यानात ठेवणे योग्य ठरेल. सप्ताहांती करमणुकीचा आनंद घ्याल.

### वृश्चिक : आर्थिक सुबत्ता लाभेल

मित्र मंडळींच्या गाठीभेटी तुमचा उत्साह वाढवतील. समारंभ आणि स्नेहभोजनाला तुमची उपस्थिती राहील. आर्थिक सुबत्ता तुमचा आत्मविश्वास वाढवेल. मतभेदाच्या प्रसंगात एखाद्या ज्येष्ठांचे चार शब्द तुम्हाला ऐकावे लागण्याची शक्यता आहे. आपले बोलणे संतुलित ठेवल्यास गैरसमज टाळता येतील. उत्तरार्ध कुटुंब सुखाचा आणि कुटुंब स्वास्थ्याचा आहे.

### धनु : चैनीची प्रवृत्ती वाढेल

अडथळे आले तरी त्यातून मार्ग काढणे शक्य होईल. शनी भ्रमण वैचारिक परिपक्वता देणारे तसेच परिश्रमाची मानसिक आणि शारीरिक ताकद देणारे आहे. उत्साह वाढता असला तरी मंगळ भ्रमण घाईने कृती करायला उद्युक्त करेल. चैनीची प्रवृत्ती वाढती राहील. गुरुवारी कोणावरही टीका करणे, अवहेलना करणे टाळा. उंचावलेली प्रतिमा टिकविण्यासाठी संतुलित वर्तणुकीची गरज आहे.

### मकर : अपेक्षापूर्तीचा आनंद

तुमच्या नोकरीतील अथवा व्यवसायातील उपक्रमात हितचिंतकांची मोठी मदत होऊ शकते. व्यावसायिक यशप्राप्तीसोबत सामाजिक प्रतिष्ठावृद्धी करणाऱ्या घटना घडतील. तुमचे विचार आणि मतांना अपेक्षित प्रतिसाद मिळेल. गुरुवारी जवळच्या एखाद्या व्यक्तीशी तीव्र वादविवाद होण्याची शक्यता आहे. तुमच्या राशीतील मंगळाशी प्रतियोग करणारा बुध शब्दिक फटकेबाजी करण्याचा निदर्शक आहे. सप्ताहाचा शेवट सुख,समाधान आणि अपेक्षापूर्तीचा आनंद देणारा आहे.

### कुंभ : आरोग्याबाबत दक्ष राहा

नातेसंबंध आणि हितसंबंध सुधारण्यासाठी काही विशेष प्रयत्न करावे लागण्याची शकयता आहे. व्यावसायिक आणि व्यापारी यांना सरकारी चौकशांचा सामना करायला लागू शकतो. राशीतील शनी हा सांध्यांची दुखणी निर्माण करण्याची शक्यता आहे. गुरुवार विरोधकांना धूळ चारणारा आहे. सप्ताहाचा शेवट मौजमजेचा असला, तरी स्वतःच्या आरोग्याबाबत दक्ष राहण्याचा आहे.

### मीन : मार्ग काढाल

प्रवासातून जवळच्या व्यक्तींचा वियोग शक्य आहे. व्यय स्थानातील शनी विविध घटनांकडे नकारात्मक भूमिकेतून पहाण्यासाठी उद्युक्त करू शकतो. एखाद्या प्रसंगाच्या तात्पुरत्या नैराश्यातून त्वरित बाहेर पडणे आपल्या हिताचे राहील. आपले बोलणे संतुलित ठेवल्यास गैरसमज टाळता येतील. अंगिकारलेल्या उपक्रमात तुमच्या परिश्रमाने अपेक्षित यशप्राप्ती होऊ शकते. आपली संगत आणि विचार शुद्ध आणि सात्विक आहेत याची खात्री करा. बुद्धी चातुर्याने तुम्हाला कोणत्याही कठीण परिस्थितीतून मार्ग काढता येऊ शकतो.

■ ज्योतिषभास्कर शिरीष कुलकर्णी
मो. नं. ८७८८२६६६९०

# फ्लोरल्सचा ट्रेंड

## वेचक-वेधक

फ्लोरल म्हणजे फुला-फुलांच्या डिझाइनचे वा प्रिंटचे शर्ट आता मुलांच्या वॉर्डरोबचा भाग होऊ लागले आहेत. फ्लोरल्स खूप छान दिसतात. मात्र ते योग्य पद्धतीने कॅरी करणं आवश्यक आहे. आयुष्यात थोडे रंग भरण्यासाठी फ्लोरल शर्ट तुमच्या फॅशनचा भाग व्हायला हवेत. फ्लोरल्समुळे तुमचं व्यक्तिमत्त्व खुलू शकतं. ट्रेंडी फ्लोरल्स कशा पद्धतीने कॅरी करता येतील याविषयी...

- प्लेन, चेक्स कवा स्ट्राईप्सवाले शर्ट घालण्याची सवय असणाऱ्या मुलांना फ्लोरल वा प्रिंटेड शर्टशी पटकन जुळवून घेता येत नाही. अशा वेळी न्यूट्रल रंगांची निवड करून सेफ गेम खेळता येईल. फ्लोरल प्रिंटवाला बेज रंगाचा कॉटन शर्ट आणि खाकी पँट असं कॉम्बिनेशन करा. यासोबत ड्रेस शूज कॅरी करा. ऑफिसमध्ये कॅज्युअल वेअर म्हणून असा पेहराव करता येईल.
- फ्लोरल शर्टवर डेनिम जॅकेट घालता येईल. यामुळे तुमचा लूक फार बटबटीत वाटणार नाही. तसंच तुम्ही ट्रेंडीही दिसाल. फ्लोरल शर्ट, डेनिम जॅकेट, ब्लू डेनिम जीन्स आणि स्नीकर्स घालून तुम्ही चित्रपट बघायला जाऊ शकता.
- मोठ्या प्रिंटवाला किंवा गडद रंगाचा फ्लोरल शर्ट आणि फिकट रंगाची पँट हे कॉम्बिनेशन शोभून दिसेल. अशा शर्टसोबत लिननची ऑफ व्हाईट पँट घाला. ग्रीन कॅनव्हास स्नीकर्सनी तुमचा लूक खुलवा. मित्रमंडळींसोबत भटकंती करायला जायचं असेल तर हा पेहराव बेस्ट ठरेल.
- जास्त स्टायलिश दिसायचं असेल तर काळ्या टी शर्टवर फ्लोरल प्रिंटचा शर्ट जॅकेटसारखा कॅरी करा. यावेळी ब्राउन ट्राउझर घाला. कॉफी डेटसाठी हा पेहराव अगदी उत्तम आहे.
- मोनोक्रोमॅटिक फॅशनही करता येईल. काळ्या फ्लोरल शर्टवर काळी पँट घाला. स्नीकर्सऐवजी काळ्या स्लीप ऑन्सही निवड करा. कॅफे वा रेस्टॉरंटमध्ये जाताना हा लूक कॅरी करा.
- खास प्रसंगासाठी तयार होतानाही फ्लोरल्स कॅरी करता येतील. फ्लोरल शर्टवर ऑफ व्हाईट ब्लेझर घाला. सोबत ज्यूट कॉटन ट्राउझर असेल तर उत्तमच! फ्लोरल कफलिंक्स, पॉकेट स्क्वेअरने तुमचा लूक खुलवा.




## माय कॅमेरा



कोलकाता पश्चिम बंगाल राज्याची राजधानी आहे. गंगा नदीची उपनदी असलेल्या हुगळी नदीच्या किनाऱ्यावरील हे शहर ब्रिटिश भारताचीही राजधानी होती. भारतातील पहिली भुयारी रेल्वे ही कोलकाता येथे धावली होती. हे भारतातील प्रगत, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय शहर आहे. कोलकाता हे शहर संपूर्ण भारतात कालीमातेच्या मंदिरासाठी आणि फुटबॉल या खेळासाठी प्रसिद्ध आहे. कोलकाता येथील प्रसिद्ध दक्षिणेश्वर काली मंदिराचे हे दृश्य.

वेगवेगळ्या पिकनिक स्पॉटवर फोटो काढण्याची क्रेझ सध्या वाढते आहे. हे लक्षात घेऊन वाचकांनी काढलेल्या आकर्षक आणि कलात्मक छायाचित्रांना 'माय कॅमेरा' या सदराअंतर्गत प्रसिद्धी देण्यात येईल. छायाचित्राबाबत थोडक्यात माहितीही वाचकांनी पाठवावी. छायाचित्रे पाठविण्याचा पत्ताः
lokshahivartapratibimb@gmail.com

## पर्यटन



# केरळमधील सुंदर पूवर बेट


पूवर हे दक्षिण भारतातील केरळ राज्यातील तिरुअनंतपूरम् जिल्ह्यातील अतिशय रम्य, निसर्गाने नटलेलं एक छोटसं केरळमधील पर्यटन स्थळ आहे. छोटे जरी असले तरी कीर्ती मात्र महानच याची प्रचिती तिथे जाऊनच येते. त्रिवेंद्रमपासून जवळपास तीस कि.मी. अंतरावर आहे. तिथे गेल्यानंतर हे स्थळ पटकन दृष्टीस पडत नाही. ड्रायव्हरने तिकडे गाडी वळवली आणि तिथे उतरताच असे वाटले की इथे तर काहीच दिसत नाही. इतकी शांतता त्या बेटावर नांदत होती.

जरा घाईगडबडीच्या, रोजच्या दैनंदिन धावपळीतून शांत वाटत होते तर नेमकं इथे काय आहे याची उत्सुकता मनाला लागलेली होती. मनामध्ये कुतूहल निर्माण झाले आणि जेव्हा आम्हाला तिथल्या कर्मचारांनी तिथे त्या बेटाविषयी माहिती दिली. तेव्हा इथे बोटिंग असून आपल्याला बोटमध्ये बसून निसर्गाच्या सानिध्यामध्ये केवळ त्याचं फुललेलं सौंदर्य बघायचं होतं. त्याचा मनमुराद आनंद घ्यायचा होता. कारण निसर्गावर भरभरून प्रेम करणारे असले की मग कशाला बाकी विचार करायचा? आम्ही सर्व ठरवून सहाजण असल्यामुळे सहा सीटर बोट मध्ये चार्जेस भरून बोटीत बसलो. खरं म्हणजे समोर अलेप्पीला पण बोटिंग होतेच पण इथला मोह टाळता आला नाही. विदेशी पर्यटकसुद्धा येथे भेट देतात आणि इथल्या निसर्गाचा मनमुराद आनंद लुटतात.

हे बेट म्हणजे एक त्रिवेणी संगमच..! तलाव, नय्यर नदी आणि अरबी समुद्र या तिन्हीने मिळून बनलेलं हे बेट! आम्ही नावेत स्वार होऊन निसर्ग सौंदर्याचा आनंद घ्यायला



निघालो. थोडी भीती पण वाटत होती कारण पाणी स्वच्छ नव्हते. थोडे गढूळ हिरवट साचलेल्या पाण्यासारखे वाटत होते, पण हळूहळू आमची बोट समोर जात होती. क्षेत्र कुठे निमुळते तर कुठे पसरलेले दिसत होते. आजूबाजूला दाट झाडी! त्यामध्ये त्यादिवशी सूर्यदेवही जरा सुटी असल्यासारखे आळसलेलेच. मध्ये जाग आली तर एखादा किरण त्या दाट मॅंग्रुव्हजमधून अलगद एखादी फांदी बाजूला करून बघत होता. पावसाळी वातावरण होते, हवेत हलकासा गारवा आणि त्यात हिरवीगर्द दाट वाढलेली झाडे. भीतीही वाटत होती आणि कुतूहलझी वाटत होते. कुठे साचलेले



पाणी वाटायचे तर कुठे शांत तरंग उठणारे हिरवटछटा असणारे, तर कधी स्वच्छ वाहतं पाणी दिसत होते. सुरुवातीला तलावाचे पाणी असल्यामुळे तो परिसर तसा छोटाच दिसत होता. त्या दाट मॅंग्रुव्हजमधून बोट पुढे पुढे निघत होती. तिथे साधारण पाण्याची लेव्हल पाच ते सहा फूट खोल असेल, थोडंसं अंधारलेलं..! आमची बोट वाट काढीत समोर जात होती. घनदाट मॅंग्रुव्हजची झाडी, पाण्यात असणारे जीवजंतू मनाला थोडी हुरहूर लागलेली होती. ॲनाकोंडा चित्रपटातील दृश्य आठवायला लागले. हे फील येणार हे आधी तसे सांगितले होतेच. त्यामुळे सतत ॲनाकोंडा डोळ्यासमोर येत होता. शांत वातावरण, घनदाट मॅंग्रुव्हज (खारफुटी)जंगल, पाण्याचा काय तेवढाच आवाज! मध्येच एखादा किंगफिशर दिसत होता. एखादा पक्षी सुरकन येऊन मासोळीवर ताव मारून पाण्याला डंख मारून काहीतरी सापडल्याच्या आनंदात भुरकन उडून जात होते. अनेक प्रकारचे पक्षी तिथे दिसतात म्हणून सांगितले होते, पण आम्हाला ब्लॅक डार्टर पक्षी खूप वेळा दिसला. कधी एकटक पाहत तर कधी पंख वाळवत मस्त एखाद्या फांदीवर नाही तर काहीतरी एखादा लाकडाचा ओंडका त्यावर आपले दोन्ही पंख पसरवून सर्वांना आकर्षित करीत होता. जणू खिच मेरी फोटो म्हणत होता की काय कोण जाणे ? त्याचे भरभरून फोटो काढलेत आणि त्याला कॅमेऱ्यात कैद केले. किनाऱ्यावरील किंचित वाकलेली हलणारी नारळाची झाडे त्या सौंदर्यात अजूनच भर घालीत होते. जलपर्णी मात्र ठाण मांडून जिथे तिथे पाण्यावर डोलत होती. निमुळत्या पात्रानंतर एका विस्तीर्ण पात्रातून आमची बोट मार्ग काढत होती. त्या बेटा मधील तरंगणारे हॉटेल, समोर चर्च हे खासकरून तेथील आकर्षण. बोट अशीच फिरत-फिरत वेढा घेऊन एका बाजूने समुद्र आणि एका बाजूने नदीचे पाणी आणि मधोमध तयार झालेला तो गोल्डन सँड बीच. आता मात्र थोडी पाण्याची खोली वाढलेली होती, पात्र वाढलेले होते,पाण्याचा वेगही जाणवत होता. नदीचे पाणी आणि समुद्राचे पाणी यांचे मिलन जणू एकमेकांची गळाभेट घडत होती आणि आनंदाने उफाळत होती. सुरुवातीला तलावाचे पाणी, नदीचे आणि समुद्राचे जणू बालपण, तरुणपण, प्रौढत्व या तिन्ही पाण्याच्या अवस्था आम्ही डोळे भरून बघत होतो. नदी आणि अरबी समुद्र यामधील तो बीच. आम्ही बोटीतून उतरून बीचवर चालायला लागलो. त्या सोनेरी मुलायम वाळुतून फिरताना एका सुखद अनुभवाला स्पर्श करीत आम्ही हे दृश्य न्याहाळत होतो. समोर उधाणलेला,खळाळता,फेसाळला समुद्र..! लाटांचा वेग जरा इथे जास्तच होता आणि खोल असल्यामुळे तिथे एक प्रकारचा उतार तयार झालेला होता. कारण खोल असल्यामुळे लाटांचा भार हा चढता असून ती वरसुद्धा येते याच्या खाणाखुणा मात्र रेतीमध्ये दिसत होत्या. त्यासुद्धा आंघोळ करून अंग वाळवीत छान पहुडल्या होत्या आणि त्या स्पॉटवर जाण्यासाठी खास करून मनाई होती कारण थोडा तो खोलगट थरारक बीच असल्याचे बघताच कळत होते.

**रेखा सोनारे**
नागपूर, मो. ९९७०३६२७५७